भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ९१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०२/२०१८

१) जबरदस्तीने करून सोन्याचे दागीने व नगदी पैसे व साहीत्याची चोरी. :—

दिंनाक १६/२/२०१८ चे १९.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी घनश्याम श्रीराम पुडे वय ४५ वर्ष, रा. मांगली तुमसर हा त्याचे मोहाडी येथील माँ जगदंबा ज्वेलर्य चे दुकाण बंद करून सोन्याचे दागीने व नगदी ७०,०००/रु. एका थैलीत घेवुन त्याचे मोटार सायकलने मांगली येथे जात असता २ अनोळखी आरोपी इसमांनी तुमसर रोडवरील सदगुरू स्टाईल्स दुकाना जवळ मोटार सायकलला आडवे होवुन मारपीट करून जबरदस्तीने फिर्यादी जवळील सोन्याचे दागीने, एकुन वजन २०७, ग्रॅम किमती ६,२१,०००/रु. नगदी ७०,०००/रु, मोटार सायकल कि. २०,०००/रु, व्हिवो कंपनीचा मोबाईल कि.५,०००/रु. असा एकुन ७,१६,०००/रु. चा माल जबरदस्तीने चोरून नेल्याने फिर्यादीचे बयाणा वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३९२,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोउपनि. गेडाम पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

२) विवाहितेस शारीरीक व मानसीक छळ करून तिला जिवानीशी ठार करून पुरावे नष्ट केल्याचा संशय व्यक्त केल्याने गुन्हा नोंद :—

दिंनाक १६/२/२०१८ चे १६.०० वाजता पुर्वी पो.स्टेला मर्ग क्र. ०६/१८ कलम १७४ जाफौ. मधील मृतक सौ. मिना दिपक गेडाम वय २८ वर्ष रा. गायडोंगरी हिच्या मृत्युची चौकशी दरम्यान व तीचे वडील फिर्यादी यांनी मृतकचा पती, सासु—सासरे यांनी मृतक मुलीस शारीरीक व मानसीक छळ करून तिला जिवानीशी ठार करून पुरावे नष्ट केल्याचा संशय व्यक्त केल्याने, व फिर्यादी हिरालाल ताराचंद सुखदेवे वय ५८ वर्ष रा. खांबाळी यांचे तोंडी रिपोर्ट व मृतकचे पोस्टमार्टम रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३०२,२०१,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. ताजने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

३) महिलांच्या मनात लज्जा निर्माण होईल असे अश्लिल व्हिडीओ क्लीप टाकल्याने गुन्हा नोंद :—

दिंनाक १७/२/२०१८ चे १३.५१ वाजता दरम्यान यातील फिर्यादी यांचे व्हॉट्स्अप ग्रुप असुन या ग्रुपवर आरोपी सुध्दा सदस्य आहे, यातील आरोपी याने, फिर्यादीचे व्हॉट्स्अप ग्रुपवर स्वत:चे मोबाईल वरून अश्लिल व्हीडीओ क्लीप टाकल्याने, फिर्यादी तसेच ग्रुपमध्ये असलेले नगर परीषद पदाचे, महीला पुरूष नगर सेवक महिला कार्यकर्त्यांच्या मनात लज्जा निर्माण झाल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५४(अ),(१),२९२(२)(अ) भादवी. सहकलम ६७ (अ) माहीती तंत्रज्ञान अधी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोनी. ताजने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

४) अल्पवयीन मुलीला रस्त्यात अडवुन अपमानीत केल्याने, गुन्हा नोंद :—

दिंनाक १६/२/२०१८ चे १०.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही टयुशन क्लॉसला सायकलने जात असता, यातील विधी संघर्ष बालक याने अॅक्टीवा गाडीने येवुन तिला रस्त्यात अडवुन तिला 'तु कुठे चाललीस तुला कॉलेजला सेडतो, नाही तर चल फिरायला कुठेतरी जाऊ' असे बोलुन तिला अपमानीत केल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ५०९,३४१,३४ भादवी. सहकलम १२ बा.लै.अ.का.२०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोउपनी. आत्राम पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

५) शासकीय कृषी गोडावुन मधील अनुदानीत सामानाची चोरी :—

दिंनाक १६/२/२०१८ चे १६.३० वाजता यातील कोणीतरी अज्ञात चोराने शासकीय कृषी अवजारे व साहीत्य ठेवण्याचे गोडावुनचे छतावरील असलेल्या सिमेंट पत्र्याला फोडुन मोठा छिद्र पाडुन आत प्रवेश करून गोडवुन मध्ये ठेवलेल, १) रॉकींग स्पेअर (हंडी पंप) १५ नग, २) नॉपसॅक स्पेअर ५ नग, ३) पॉवर स्पेअर १६ नग, ४) ग्राव्हज इंजीन फुटबॉल १ नग असा एकुन ५५,२४२/रु. चा अनुदानीत माल चोरून नेल्याने, फिर्यादी भाऊराम दुधराम बावणकर वय ५७ वर्ष रा. मैदामीलचे मागे विदयुत कॉलोनी २ तकीया वार्ड भंडारा धंदा शायकीय नौकरी कृषी पर्यवेक्षक भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४६१,३८०भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

६) चारचाकी वाहनाच्या धडकेत एक जखमी करून मोटार सायकची नुकसान केल्याने गुन्हा नोंद:—

दिंनाक १७/२/२०१८ चे १८.३० वाजता यातील फिर्यादी श्रीधर परशरामजी मते वय ४६ वर्ष रा. फ्रेन्डस कॉलोनी खातरोड भंडारा याचे ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३६ आर २०२६ ने बॅकेत जात असतांना, यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला धडक देवुन किरकोड जखमी करण्यास व मोटार सायकलची नुकसान केल्याने, फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. माहलगावे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**७) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :-**

दिनांक १७/०२/२०१८ चे १८.३० वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही दारु पिवुन दारूचे नशेत पोस्ट ऑफीस येथे चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालॉयझर मशिन व्दारे श्वासाचा नमुना घेतला असता दारुचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके वा.नि.शा. भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोहवा. गजभिये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**८) मृत अवस्थेत महिलेचा प्रेत दिसुन आल्याने गुन्हा नोंद:-**

दिंनाक १७/२/२०१८ चे ९.०० वाजता पुर्वी यातील फिर्यादी राहुल पुरूषोत्तम दुर्गे वय ३० वर्ष रा. बजरंग वार्ड पवनी यांना त्याचे घराशेजारी घानेरडा वास आला असता, फिर्यादी यांनी त्याचे शेजारी राहणारी मृतक विमला बाई हिचे घरात जावुन डोकावुन पाहीले असता, मृतक ही मृता अवस्थेत दिसुन आल्याने, फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**९) अवैध दारु /जुगार अड्डयांवर धाडी . :-**

दिनांक १७/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर साकोली व लाखांदुर येथे अवैध दारू /जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०८ लिटर हातभट्टी कि. ८००/रु. व ०२ लिटर ७३० मिलीलीटर देशी दारू किमती ११३२/रु. तसेच जुगारातुन १५५/रु. असा एकुण २०८७ /रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-**

दिनांक १७/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२ तीन सिटर वाहनाकरीता ०९ ईतर वाहनांवरती - ७३ केसेस करण्यात आले आहे.


(मपोउपनी. प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२


प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.